D:\APA-2021\Letter 2021.doc


# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ

**कृषि नगर, वसमत रोड, परभणी - ४३१ ४०२ (महाराष्ट्र)**

| | | | |
|---|---|---|---|
| ई-मेल | : reg_mau@rediffmail.com | दूरध्वनी | : (०२४५२) २२९७५५ |
| वेबसाईट | : www.vnmkv.nic.in | फॅक्स | : (०२४५२) २२९७५५, २२३५८२ |


वाचा : १. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-ब, दिनांक १५ मार्च २०१४

२. महाराष्ट्र शासन पत्र क्र.संकीर्ण-१५१७/प्र.क्र.९४/६-अे दिनांक २०.७.२०१९

३. विद्यापीठ परिपत्रक क्र.२०२१/ CAS Circular/ प्र.क्र.१२१२/आस्था-१, दि.२३.७.२०२१

४.विद्यापीठ परिपत्रक क्र.२०२१/ CAS Circular stage 4 to 5/ प्र.क्र.१२१३/आस्था-१, दि.३१.७.२०२१

## विद्यापीठ परिपत्रक

क्रमांक २०२१/CAS Circular Stage 4 to 5 / प्र.क्र.१२१२/आस्था-१, /3070

कुलसचिव कार्यालय, वनामकृवि, परभणी

दिनांक २०.८.२०२१

संदर्भीय ३ व ४ वरील परिपत्रकान्वये विद्यापीठातील सर्व शिक्षक वर्गीय अधिकारी/ कर्मचारी यांच्याकडून कारकीर्द प्रगती योजनेंतर्गत पायरी-१ ते २, पायरी २ ते ३, पायरी-३ ते ४ व पायरी ४ ते ५ वेतनश्रेणी मिळण्यासाठी दिनांक ३०.९.२०२१ पर्यंत पात्र व अर्हताधारक शिक्षकवर्गीय अधिकारी यांनी आर्थिक वर्ष ३१ मार्च २०२१ पर्यंतचे अेपीआय स्कोअर कार्ड तयार करण्याकरीता अनुक्रमे दिनांक २३.८.२०२१ व दि.३१.८.२०२१ पूर्वी या कार्यालयास प्रस्ताव सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते.

विद्यापीठातील शिक्षक वर्गीय अधिकारी प्रस्ताव सादर करण्याकरीता वाढीव मुदत मिळण्याबाबत विनंती करीत आहेत. त्या अनुषंगाने विद्यापीठातील सर्व शिक्षक वर्गीय अधिकारी/ कर्मचारी यांना कळविण्यात येते की पायरी-१ ते २, पायरी २ ते ३, पायरी-३ ते ४ व पायरी ४ - ५ ची वेतनश्रेणी मिळण्याबाबतचे प्रस्ताव सादर करण्यास १० दिवसाची मुदतवाढ देण्यात येत आहे.

तेंव्हा पायरी-१ ते २, पायरी २ ते ३, पायरी-३ ते ४ चे प्रस्ताव दिनांक ३.९.२०२१ पर्यंत बिनचूक सादर करावेत. तसेच सदर प्राप्त प्रस्ताव विद्यापीठाने प्रसिध्द केलेल्या नियमावलीनूसार असल्याबाबतची तपासणी करून तसा अभिप्राय नोंदवून कुलसचिव कार्यालयास प्रस्ताव सादर करण्याकरीता कार्यालय प्रमुख/नियंत्रक अधिकाऱ्यांना १० दिवसाची मूदत देण्यात येत आहे. त्यांनी दिनांक १३.९.२०२१ पर्यंत पायरी-१ ते २, पायरी २ ते ३, पायरी-३ ते ४ चे प्रस्ताव सादर करावेत.

तसेच पायरी-४ ते ५ चे प्रस्ताव दिनांक १०.९.२०२१ पर्यंत बिनचूक सादर करावेत. तसेच सदर प्राप्त प्रस्ताव विद्यापीठाने प्रसिध्द केलेल्या नियमावलीनूसार असल्याबाबतची तपासणी करून तसा अभिप्राय नोंदवून कुलसचिव कार्यालयास प्रस्ताव सादर करण्याकरीता कार्यालय प्रमुख/नियंत्रक अधिकाऱ्यांना १० दिवसाची मूदत देण्यात येत आहे. त्यांनी दिनांक २०.९.२०२१ पर्यंत पायरी-४ ते ५ चे प्रस्ताव सादर करावेत.

सबब सर्व कार्यालय प्रमुख / नियंत्रण अधिकाऱ्यांना कळविण्यात येते की, पायरी-१ ते २, पायरी २ ते ३, पायरी-३ ते ४ चे प्रस्ताव दिनांक ३.९.२०२१ नंतर व पायरी ४ ते ५ चे प्रस्ताव दिनांक १०.९.२०२१ नंतर आपल्या स्तरावर स्विकारण्यात येऊ नये.

मा. कुलगुरू महोदय यांच्या मान्यतेने..

20/8/21

(धिरजकुमार रा. कदम)
**कुलसचिव**

प्रत :

१. प्रभारी अधिकारी, मध्यवर्ती संगणक केंद्र,वनामकृवि, परभणी यांना देवून निर्देशीत करण्यात येते की, सदर परिपत्रक व संलग्न केलेले प्रपत्रे विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

२. मा.कुलगुरू यांचे खाजगी सचिव, वनामकृवि, परभणी